सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२२/ 1625
दिनांक :- 13 JUN 2023

प्रति,

**प्राचार्य,**
तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधीत तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहिती पुस्तीकेमध्ये "करिअर कट्टा" विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ :-१.**मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२३/१७२ दि. १२ जून २०२३.
२. मा. अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५ / मशि-२, दिनांक ६ जून २०२३.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केन्द्र, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक MITSC /OUT/ FEBRUARY २०२३/M/१३१३ दिनांक ९/०२/२०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केन्द्र, कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार "करिअर कट्टा" उपक्रमाची माहिती उच्च शिक्षणाशी संबंधीत संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये देणे व या संस्थांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्देश संदर्भाधीन शासन पत्रानुसार दिलेले आहेत. दिनांक ८/६/२०२३ रोजी मा. मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर निर्देशाप्रमाणे तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांच्या माहितीपुस्तिकामध्येही करिअर कट्टा उपक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांचे नोंदणी अभियान राबविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून प्रसिध्द करण्यात येणा-या माहिती पुस्तिकेमध्ये "करिअर कट्टा" विषयक उपक्रमाची माहिती समाविष्ट करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच आपल्या संस्थेमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान मोठया प्रमाणात राबविण्या यावा. (अधिक माहितीसाठी संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.)

आपण केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल दिनांक १४/०६/२०२३ रोजी पर्यंत न चुकता या कार्यालयास सादर करावा.

सहपत्रे :- वरील प्रमाणे.

**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
**अमरावती.**

**प्रत :-**प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

Directorate of Technical Education
Maharashtra, Mumbai, India

**roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>**

# तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत....

1 message

**DESK2a Desk Officer** <desk2a@dtemaharashtra.gov.in> Tue, Jun 13, 2023 at 12:15 PM
To: Regional Office <rooffice@dtemaharashtra.gov.in>
Cc: uva jagar Abhiyan <uvajagar@gmail.com>

--
Sir, Please find the letter attached herewith.

With Warm Regards,

-----------------------------

**Admission Section,**
**Desk 2a, DTE,**
**Mumbai 400001**
**022-68597465/447**

**Letter to All RO regarding carrier katta.pdf**
5243K

13/06/23

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२३/ १७२ दिनांक : 12 JUN 2023

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत....**

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २३२३/ प्र.क्र.११५/ मशि-२, दिनांक ६.६.२०२३

२) अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक MITSC/OUT/FEBRUARY २०२३/M/१३१३, दिनांक ९.२.२०२३

शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार **" करिअर कट्टा "** उपक्रमाची माहिती उच्च शिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये देणे व या संस्थांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्देश संदर्भाधीन शासन पत्रानुसार दिलेले आहेत. दिनांक ८.६.२०२३ रोजी मा.मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर निर्देशाप्रमाणे तंत्रशिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकांमध्येही करिअर कट्टा उपक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांचे नोंदणी अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून प्रसिध्द करण्यात येणा-या माहिती पुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक उपक्रमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत आणि विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात यावे. अधिक माहितीसाठी संदर्भाधीन पत्रांची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी आपल्या अधिनस्त संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक विभागाने संकलित करुन विभागनिहाय एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा. संस्थांना थेट संचालनालयास अथवा शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात येऊ नये या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी :-

१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई

२. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर (ई मेल द्वारे uvajagar@gmail.com)

E:\Budage\2023-24\General Correspondence\Carrier Katta\Letter to All RO regarding carrier katta.docx

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार इमारत, दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२/२२७९३१७७
ई-मेल: mashi२-hted@mah.gov.in

क्रमांक:संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५/मशि-२,
दिनांक : ६ जुन, २०२३

प्रति,

संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :-** राज्यतील सर्व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये करिअर कट्टा विषयक माहिती देणे व नोंदणी अभियाण राबविणेबाबत.

**संदर्भ :-**आपले पत्र क्र. विद्यार्थी/२११९/प्र.क्र.२७/मवि-१/६६२३ दि. २९.५.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, गतवर्षी प्रमाणेच चालू शैक्षणिक वर्षांतही राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये करिअर कट्टा या उपक्रमाची माहिती समाविष्ठ करणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबतच्या सुचना परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालये व विद्यापीठांना देण्यात याव्यात, ही विनंती.

( हे.सु.पाठक )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

Maharashtra Information Technology Support Cente
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1313 दि.09-02-2023

22 FEB 2023
जावक क्रमांक :- 3263
शाखा - मवि 7

प्रति
**मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
संचालक,
उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र राज्य

विषय :- राज्यातील सर्व महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये करिअर कट्टा विषयक माहिती देणे व विद्यार्थी नोंदणी अभियान राबवणेबाबत.......

संदर्भ :- क्र.१ : महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य
विद्यार्थी/ २११९/प्र.क्र.२७//मवि-१.२१०५
दिनांक १८-०२-२०२१
क्र.२ : महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
१९/तंशिसं/क्कासे/२०२१/१२
दिनांक १२-०२-२०२१

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती अशी की, महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने **"करिअर कट्टा"** हा उपक्रम **"२५ फेब्रुवारी२०२१"** पासून आतापर्यंत राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये सुरू आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी वर्षभर सातत्याने करिअर विषयक मार्गदर्शन करणारा महत्त्वकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास, कौशल्य विकास यासारखे मार्गदर्शन तसेच महाविद्यालयांसाठी सामंजस्य करारा अंतर्गत कौशल्य विकास केंद्राद्वारे विशेष अभ्यासक्रम, इनक्यूबेशन सेंटर, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र इत्यादी उपक्रम राबवले जात आहेत. राज्यभरातील सर्व विद्यापीठे, हजारो महाविद्यालये आणि लाखो विद्यार्थी या प्रकल्पात सहभागी झालेले आहेत. प्रत्येक शैक्षणिक संस्थांच्या सन्माननीय संचालक मंडळाचे प्रतिनिधी, प्राचार्य आणि प्राध्यापक या महत्त्वपूर्ण घटकांच्या सहकार्याने हे अभियान यशस्वी ठरले आहे. या अभियानाचा पुढील टप्पा म्हणून राज्यभरात **"CENTER OF EXCELLENCE"** ची निर्मिती करण्याचा महत्त्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याअन्वये राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये **"100 CENTER OF EXCELLENCE"** ची निर्मिती होणार
असून, त्याचा फायदा महाविद्यालयाच्या भौतिक सुविधांचा विकास, आर्थिक सहाय्य,
नवीन शैक्षणिक धोरणात आवश्यक ते व्यवसाय निर्मिती विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शकांचा सहवास आणि विशेष अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत.
नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून **"चॉईस बेस क्रेडिट सिस्टीम"** साठीचे अभ्यासक्रम देखील या उपक्रमांतर्गत सुरू आहेत. सदर उपक्रम राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये पदवीच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपासून सुरु व्हावा यासाठी त्याची माहिती महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये देऊन **"विद्यार्थी नोंदणी अभियान"** राबविणे आवश्यक आहे, तरी या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करावा ही विनंती.

आपला विश्वासू,

Yasswant

श्री. यशवंत शितोळे
अध्यक्ष,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

मवि 7 श्री शिंदे
21.2.23

**Yashwant Shitole**
*Founder President*
**+91 73044 29777**

Mahila Bank Basement,
Khasbag Maidan, Kolhapur-416 012
0231-2993950
www.mitsc.co.in
uvajagar@gmail.com

# महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागआणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी......

- **संकल्पना:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रम मागील दोन वर्षापासून महाराष्ट्रातील युवकांच्यासाठी कार्यरत आहे. महाराष्ट्रातील काही विशिष्ट शहरांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांचा वाढणारा ओढा तसेच त्यामध्ये असणाऱ्या काही व्यावसायिक चुकीच्या कार्यपद्धतीमुळे वर्षानुवर्ष आयुष्यातील उमेदीचा काळ केवळ तयारीसाठी वाया गेल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पदरी पडणारी निराशा या सगळ्याचा विचार करता करिअर कट्ट्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील IAS, IPS अधिकाऱ्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन देण्याच्या उद्देशाने "आयएएस आपल्या भेटीला" हा उपक्रम चालवला जातो. ज्या अंतर्गत UPSC,MPSC, SSC, पोलीस भरती आणि बँकिंग या सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षा विषयीची प्राथमिक माहिती दिली जाते तसेच त्यांना त्या विषयाची संपूर्ण तयारी करून घेण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जाते. त्याबरोबरच स्पर्धा परीक्षेच्या पलीकडे जाऊन नोकरी मागणाऱ्या हातांपेक्षा नोकरी निर्माण करणारे उद्योजक घडले पाहिजेत, या उद्देशाने "उद्योजक आपल्या भेटीला" या उपक्रमांतर्गत 3500 पेक्षा जास्त उद्योजक विद्यार्थ्यांना नियमितपणे उद्योजकता विकासासाठी मार्गदर्शन करीत असतात. या महत्त्वाच्या उपक्रमाबरोबरच नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत सुरू असलेल्या "चॉईस बेस क्रेडिट सिस्टम" अंतर्गत राज्यांमध्ये एकसूत्रता यावी व विद्यार्थ्यांना ग्रामीण व शहरी भागाची मर्यादा न राहता त्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांची उपलब्धता व्हावी, या उद्देशाने ऑनलाइन कोर्सदेखील सुरु करण्यात आलेले आहेत. प्रत्येकी 2 क्रेडिटचा 1 असे 50 कोर्सेस या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना दिले जातात.

राज्यातील महाविद्यालयामध्ये प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला पदवीच्या पहिल्या वर्षाला असताना देशपातळीवर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पदांची माहिती उपलब्ध झाली आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी पदवीचे दोन ते तीन वर्ष त्यांनी मेहनत घेतली तर निश्चितच राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्रीयन युवकांचा मोठा वाटा आपल्याला बघायला मिळेल, तसेच जे विद्यार्थी या माध्यमातून यश मिळवू शकणार नाहीत त्यांना वेळीच त्यांचा प्लॅन बी तयार करून त्याच्यावर काम करणे सोपे होईल.उद्योजकता विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असणारा अनुभव संपन्न उद्योजकांच्या मार्गदर्शनाचा भाग पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य वृद्धीसाठी विद्यार्थ्यांना कोर्सेस दिले जातात तसेच **"उद्योजक संसद"** ही **CENTER OF EXCELLENCE** अंतर्गत तयार केली जाते ज्या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कंपनीच्या वेगवेगळ्या पदांवर काम करण्याचा अनुभव दिला जातो तसेच त्यांना भांडवल देखील उपलब्ध करून दिले जाते. ज्या पद्धतीने नेतृत्व विकासासाठी विद्यार्थी संसद आतापर्यंत कार्यरत आहे आणि त्याचे होणारे सामाजिक चांगले परिणाम आपण बघत आहोत त्याच पद्धतीने उद्योजक संसद हे देखील राज्याच्या उद्योजकीय विकासासाठी अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडतील असे वाटते, त्यामुळे **"करिअर कट्ट्याचा"** हा उपक्रम राज्यातील सर्व महाविद्यालयातील पदवीला प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

## • कार्यपद्धती:

राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत दरवर्षी 14 लाखहून अधिक विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला प्रवेशित असतात. बहुतांशी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयीचे योग्य ज्ञान व माहिती ही पदवीच्या शेवटच्या वर्षाला किंवा पदवी पूर्ण झाल्यानंतर मिळते आणि त्यानंतर ते तयारीला सुरुवात करतात. वयोमर्यादेमुळे पुरेसा वेळ तयारीसाठी मिळत नाही तसेच तयारीची दिशादेखील बदलते. देशातील काही दक्षिणेतील राज्यांमध्ये ही तयारी करण्यासाठी प्राथमिक तसेच उच्च माध्यमिक स्तरावर प्रयत्न केले जात असतात. याच पार्श्वभूमीवर आपण आपल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये प्रवेशित होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला पहिल्या सेमिस्टर मध्येच तीस तासांचा म्हणजेच दोन क्रेडिटचा एक कोर्स देऊन

देशभरामध्ये असणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, पदनाम, अभ्यासक्रम, तयारीचे स्वरूप इ.ची माहिती देणारा कोर्स दिला जाईल.

### □ पदवी पहिले वर्ष :

१) स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांबरोबरच खाजगी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीची क्षमता वाढवायची असेल तर महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय कौशल्य विकास होणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, त्यामुळे उद्योजकीय क्षेत्रातील विविध संधी, कौशल्य व कार्यपद्धती याची माहिती देणारा दोन क्रेडिटचा कोर्स विद्यार्थ्यांना दुसऱ्या सेमिस्टरमध्ये उपलब्ध करून दिला जाईल.

२) शासकीय नोकरी व उद्योजकता या पलीकडे जाऊन खाजगी आस्थापनावर असणाऱ्या वेगवेगळ्या नोकरीसाठी आवश्यक असणारे कौशल्य आत्मसात करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जे वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. त्या कौशल्य विकास उपक्रमांची माहिती व प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठीचा एक कोर्सदेखील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जाईल.

३) 240 भागांमध्ये संपूर्ण भारतीय संविधानाचे तुलनात्मक प्रशिक्षण देणारा अभ्यासक्रम देखील तयार करण्यात आलेला आहे व त्यावर आधारित तीस तासांचा भारतीय संविधानाची ओळख करून देणारा कोर्स देखील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जाईल.

४) सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्राची ओळख व यामध्ये होणारे बदल याविषयी देखील दोन क्रेडिटचा कोर्स करिअर कट्ट्यांतर्गत विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत. करिअर कट्ट्याअंतर्गत स्पर्धा परीक्षेचा बेसिक पहिला क्रेडिट कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील पद्धतीचे सविस्तर प्रशिक्षण देणारे कोर्सेस उपलब्ध आहेत.

### ? पदवी दुसरे वर्ष :

१. UPSC पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम.

२. MPSC लेखी परीक्षेची तयारी.

३. SSB व SSC परीक्षेचा तयारीसाठी अभ्यासक्रम.

४. बँकिंग क्षेत्रातील रोजगाराच्या संधीसाठी आवश्यक असणारे स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण.

५. पोलीस भरतीसाठी असणारे लेखी परीक्षेचे प्रशिक्षण.

## ▪ पदवी तिसरे वर्ष :

१) सर्व पद्धतीच्या परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या मुलाखतींची तयारी करून घेण्यासाठी कम्युनिकेशन स्किल डेव्हलपमेंट तसेच इंक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाईल. पदवी पूर्ण केल्यानंतर पाया मजबूत असणारे हेच विद्यार्थी पुढे जाऊन राज्य शासनाच्या ट्रेनिंग सेंटर साठी उपलब्ध झाले तर ट्रेनिंग सेंटरच्या यशस्वीतेमध्ये वाढ होण्यास देखील याची मदत होईल.

## • विद्यार्थी:

१) विद्यार्थ्यांना 365 रुपये मध्ये 1000 दिवसांसाठी म्हणजेच तीन वर्षांसाठी त्याचे सभासद होता येईल. यामध्ये विद्यार्थ्यांना 1000 दिवस सातत्यपूर्ण स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास याविषयीचे मार्गदर्शन ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होईल.

२) विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार आवश्यक असणाऱ्या चॉईस बेस सिस्टम अंतर्गत आवश्यक असणारे 50 शॉर्ट टर्म कोर्सेस उपलब्ध असतील, पैकी प्रतिवर्ष 5 कोर्सेस मोफत शिकवले जातील.

३) महाविद्यालयाच्या वेळेव्यतिरिक्त व ऑनलाईन प्रशिक्षण उपलब्ध असेल.

४) मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाईल.

## • उपक्रमाची वैशिष्ट्ये:

- ❖ अभूतपूर्व असा हा उपक्रम
- ❖ 03 वर्षाचे 1000 दिवस हा उपक्रम राबवला जाईल.
- ❖ दररोजचा खर्च प्रती विद्यार्थी केवळ 0.36 पैसे
- ❖ राज्यात उपलब्ध असणाऱ्या किमान साधनांचा उपयोग करून हा उपक्रम राबवणे शक्य आहे.

- कुटुंबासाठी प्रति विद्यार्थी येणारा 3 वर्षाचा खर्च हा 365 रुपये इतका असल्यामुळे त्याला तो सहज शक्य आहे
- सातत्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून त्या विषयाची आवड निर्माण करणे, त्यासाठी आवश्यक मानसिकता तयार करणे हे सहज शक्य आहे.
- शिक्षण विभागाचे मंत्री महोदय दर महिन्याला राज्यातल्या लाखो विद्यार्थ्यांना संबोधित करू शकतील.
- महाविद्यालयातील १० टक्के गरजू विद्यार्थ्यांना मोफत सदस्यत्व दिले जाते.

## • उपक्रमाची कार्यपद्धती:

- **उच्च व तंत्रशिक्षण विभागाची जबाबदारी** – सदर उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच सहायक शिक्षण संचालकांच्या मदतीने महाविद्यालयापर्यंत उपक्रमाची माहिती पोहचवणे. सदर उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे की नाही, यासाठी वेळोवेळी अहवाल मागवुन घेणे व गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करणे .

- **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राची जबाबदारी-** आवश्यक असणारी सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक असणारे सर्व व्याख्याते, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांच्यापर्यंत माहिती पोहचण्यासाठी नियमित उपक्रमाची दिनदर्शिका उपलब्ध करून देणे, उपक्रम नियमितपणे व सुरळीत सुरू राहण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभी करणे.

- **विद्यापीठस्तरीय जबाबदारी** – संलग्न महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

- **महाविद्यालयांची जबाबदारी-** महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

- **समाविष्ट उपक्रम :**

1. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी असणाऱ्या करिअर कट्टा अंतर्गत स्पर्धा परीक्षा व उद्योजकता विकास यासाठी IAS आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला हे उपक्रम.
2. भारतीय संविधानाचे पारायण
3. वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी
4. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र
5. Incubation Center उद्योजकता विकासासाठी
6. कौशल्य विकासासाठी मॉडेल स्किल डेव्हलपमेंट सेंटर
7. विद्यार्थ्यांचे कौशल्य वृद्धीसाठी ५० ऑनलाईन मोफत कोर्सेस
8. प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा
9. प्राध्यापकांसाठी आवाजाची कार्यशाळा
10. वेगवेगळे MOU उपक्रमाच्या माध्यमातून नॅकमध्ये २४० पेक्षा जास्त गुणांची महाविद्यालयास होणारी उपयोगिता
11. महाविद्यालयिन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी मानधनाची तरतुद .
12. विद्यार्थी नोंदणी :- 1) ऑनलाइन पद्धतीने 2) ऑफलाइन पद्धतीने
13. आर्थिक साक्षरता कार्यशाळा

महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये छापवायचा मराठी नमूना





# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....




- आयएएस आपल्या भेटीला
  - * राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग
  - * पोलीस भरती
  - * बँकिंग सेवा
  - * स्टाफ सिलेक्शन कमिशन
  - * केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)
- उद्योजक आपल्या भेटीला
- भारतीय संविधानाचे पारायण
- पर्यावरण शास्त्र अभ्यासक्रम

सभासद शुल्क
रू. ३६५ (३ वर्षासाठी)
५० कोर्स मोफत

## वैशिष्ट्ये

राज्यातील पदवी प्रथम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी पहिल्या महिन्यात करिअरसाठी
शासकीय व खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी व उद्योजकता विकास हा दोन क्रेडिटचा कोर्स मोफत.
सर्व ५ प्रकारच्या स्पर्धा परिक्षांची इत्यंभूत माहिती दिली जाते, तसेच अभ्यासक्रम देखील शिकवला जातो.
५० शॉर्ट टर्म कोर्सेस मोफत प्रशिक्षण प्रति महिना पाच कोर्स याप्रमाणे.
एकदा नोंदणी केल्यास १,००० दिवस म्हणजे तीन वर्षे करिअर कट्ट्याचा लाभ घेता येईल.
करिअर कट्टा चॉईस बेस क्रेडिट सिस्टिम अंतर्गत १५ कोर्सची परीक्षा देवून प्रमाणपत्र मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना

महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये छापवायचा इंग्रजी नमूना

## Draft to include in Prospectus

**Career Katta**

**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:**
Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees:** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register:** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code:** A 466 (Please include the Career Katta code of the College)
**Contact:** For more details visit college webpage _________ or contact Coordinator Dr. Prashant Mandlik, Department of Chemistry, 94038 66611 or Career Katta Helpline 75076 52555

करियर कट्टा मध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी

SCAN ME

यूट्यूब वरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा

Subscribe me

करियर कट्टा नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठी सबस्क्राईब करा

Subscribe me

**हेल्पलाइन नंबर : 750 765 2555**